# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

*"Towards Global Technological Excellence"*

दु. क्र . (०७२१) २५३१९२९, २५३१९३० फॅक्स (०७२१) २५३१९३१

संकेत स्थळ : www.gcoea.ac.in ई मेल : principal@gcoea.ac.in


परिपत्रक

क्र.शाअमअ/अधिष्ठाता (शै)/पदवी प्र.पत्र /२०२३-२४/1765

दिनांक : ०२/०४/२०२४

संस्थेतील शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये अंतिम वर्ष B.Tech. व M.Tech. विद्यार्थ्यांचे पदवी व पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र तयार करण्यासाठी **विद्यार्थ्यांचे मराठी व इग्रजी मध्ये संपूर्ण नांव शाळा / महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्या** (Leaving Certificate) **प्रमाणे** तसेच आईचे नांव इग्रजी व मराठी मध्ये तसेच विद्यार्थ्यांचे कलर फोटोसह (पासफोर्ट साईज) अचुक माहीती (ठळक अक्षरात ) विद्यार्थ्यांकडुन **(मराठी नांवामध्ये अक्षरातील उकार, विलांटी, मात्रा अचुक )** भरुन घेवून विद्यार्थी विभागास सादर करावी. विद्यार्थ्यांचे नांवासमोर श्री. व विद्यार्थीनीचे नावासमोर कु. (आवश्यक तेथे) नमुद करावे, **विद्यार्थ्यांचे नांव त्यांच्या प्रवेश घेतेवेळी शाळा / महाविद्यालय सोडल्याच्या** (Leaving Certificate) **दाखल्याप्रमाणे** पदवी व पदव्युत्तर पदवी **प्रमाणपत्राकरीता माहीती सादर करण्यात येते.** सदर माहीती एकत्रित करुन पदवी व पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र तयार करण्यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे विहीत नमुन्यात सादर करावयाची आहे. माहीतीचा विहीत नमुना खालील प्रमाणे आहे.

यापूर्वी असे निदर्शनास आले की, उत्त्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे संपूर्ण नावाची यादी काही विभागाकडुन एकत्रित पाठविल्या जात नाही. विद्यार्थी प्रोव्हीजनल डिग्री करीता आल्यानंतर त्याचे नांव यादीमध्ये नसल्याने त्याचे उर्तीण झाल्याचे कागदपत्रे तयार नसतात. विद्यार्थी विभागामध्ये आल्यानंतर त्याचे नांव पाठविल्या जाते पर्यायाने कागदपत्रे तयार करण्यास विलंब होतो. त्यामुळे संबधीत विद्यार्थ्यांना विनाकारण मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागतो.

तरी, आपले विभागातील अंतिम वर्ष B.Tech. व M.Tech विद्यार्थ्यांचे पदवी व पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र तयार करण्याकरीता विद्यार्थ्यांच्या आईचे व विद्यार्थ्यांचे मराठी व इंग्रजी नावाची (B.Tech. व M.Tech ) स्वतंत्र व अचुक यादी विद्यार्थ्यांचे कलर फोटोसह (पासफोर्ट साईज) **दि. ३०/०४/२०२४** पर्यत सादर करावी. तसेच **उत्तीर्ण** विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र मिळण्यापासुन वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

प्राचार्य

शासकीय अभियात्रिकी महाविदयालय,

अमरावती.

प्रतः- १) अधिष्ठाता शैक्षणिक, शासकीय अभियात्रिकी महाविद्यालय, अमरावती यांना माहीती करीता अग्रेषित.

२) विभाग प्रमुख स्थापत्य-उपयोजीत यंत्रशास्त्र, यंत्र, विद्युत, अणुविद्युत, उपकरणीकरण, संगणक, माहीती तंत्रज्ञान, यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

३) समन्वयक, डाटा सेटंर सदर परिपत्रक संस्थेच्या वेबसाईडवर टाकण्याकरीता रवाना.

प्रपत्र

| Sr No | ID No. | Name of Students (English) | Name of Students (Marathi) | Mother's Name (English) | Mother's Name (Marathi) | Photo of Students |
|---|---|---|---|---|---|---|